पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय

## सभावृत्तांत

(इ क्षेत्रीय समितीची मासिक सभा)

दिनांक : ०५/०७/२०१९ वेळ: सकाळी ११.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे जुलै २०१९ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०५/०७/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या उपस्थित होते.

१) मा.बुर्डे सुवर्णा विकास - **अध्यक्षा**
२) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
३) मा. घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन
४) मा.गायकवाड निर्मला मनोज
५) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी
६) मा.बारसे प्रियांका प्रविण
७) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
८) मा.भिमाबाई पोपट फुगे
९) मा.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

या शिवाय मा.श्री.श्रीनिवास रामचंद्र दांगट - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.प्रविण घोडे – कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.पवार आर.एस.-कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, श्री.प्रदिप पुजारी- कार्यकारी अभियंता ज.नि., श्री.बी.बी.भरणे- कार्यकारी अभियंता महावितरण, श्री.बोरावके डी.एच.-उपअभियंता (स्थापत्य), श्री.संदेश खडतरे- उपअभिंयता नगररचना, श्री.प्रकाश साळवी- उपअभिंयता नगररचना, श्रीम.प्रेरणा शिनकर – उपअभियंता स्थापत्य, श्री.वहीकर एस.एस.-उपअभियंता, श्री.लांडे बी.पी. उपअभियंता, श्री.राजेश नंदलाल भाट – सहा.आरोग्याधिकारी, श्री.ए.व्ही. गुमास्ते – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.कुलकर्णी रत्नाकर.-कनिष्ठ अभियंता, श्री.ताकवले क.अभियंता (स्थापत्य.), श्रीम.वृषाली पोतदार क.अभियंता (स्थापत्य), श्री.पी.आर.गायकवाड – मुख्याध्यापक लांडेवाडी विद्यालय, सौ.भोज जे.एस.- क्रिडा पर्यवेक्षक, श्री.सुरेश कोंढरे – कार्यालय अधिक्षक अतिक्रमण, श्री. सतिश लांडगे-अतिक्रमण निरीक्षक, प्रियंका घाटोळ - समुह संघटक ना.वि.यो, श्री.विनय जगताप-स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, श्रीम.सुगंधा मेमाने-पर्यवेक्षिका शिक्षण विभाग, श्री.साळुंखे जे.जी.-मुख्याध्यापक मा.वि.भोसरी, श्री.विजय वाईकर – उप.अभिंयता.ज.नि., श्री.कोटीयाना डी.एम. आरोग्य निरीक्षक, पशुवैद्यकीय, श्री.सुरेश तारू- सर्व्हेअर नगररचना इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/ नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करून सभा सूरू करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात समाविष्ट करण्यात आले.

विषय क्रमांक १ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.३ मोशी येथील चौकाचे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक २ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
पांजरपोळ भोसरी येथे उपहारगृहासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

विषय क्रमांक ३ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
च-होली येथील मनपा शाळेचे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ४ मा.हिराबाई (नानी) गोवर्धन घुले यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.४ मधील चौक व रस्त्याचे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ५ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.३ मधील वस्तीचे नामकरण करणेबाबत.

अ) दिनांक ०७/०६/२०१९ रोजी घेणेत आलेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ०४ | | विषय क्रमांक | : | ०१ |
| दिनांक | : ०५/०७/२०१९ | | विभाग | : | नगर रचना/ शहर सुधारणा |
| सुचक | : मा.भिमाबाई फुगे | | अनुमोदक | : | मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे |

संदर्भ मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे दिनांक ०७/०६/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे भोसरी येथील सर्व्हे नं. ६८१/३ सीटीएस नं. ३४०० मधून असणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजूर विकास आराखड्यानुसार स्पॉट झोनिंग (औद्योगिक/ रहिवाशी) आहे. सदर स्पॉट झोनिंग मधील औद्योगिक व रहिवाशी नागरीकांसाठी दळणवळण तसेच औद्योगिक मालाची ने आण करणेकामी सदर रस्त्याची तात्काळ आवश्यकता आहे. सदर रस्ता नकाशात अधोरेखित असून सदर रस्ता २०५ अन्वये विकसित झाल्यास महानगरपालिका व नागरिक आणि औद्योगिकरणाची अडचण दूर होणार आहे. सदर रस्ता उत्तरेपासून दक्षिणेकडे अर्धवट स्थितीत असल्याने २०५ अन्वये विकसित करणे क्रमपात्र होईल. त्यामुळे सदर रस्ता महानगरपालिका अधिनियम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

**ऐनवेळेचे विषय**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ०५ | विषय क्रमांक | : | ०२ |
| दिनांक | : ०५/०७/२०१९ | विभाग | : | स्थापत्य, इ क्षेत्रिय कार्यालय |
| सुचक | : मा. घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन | अनुमोदक | : | मा. मा. प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०५/०७/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र.३ मोशी येथील जुना आळंदी रोड येथील चौकास "शिवयोध्दा (S.Y.) ग्रुप चौक" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ०६ | विषय क्रमांक | : | ०३ |
| दिनांक | : ०५/०७/२०१९ | विभाग | : | स्थापत्य, इ क्षेत्रिय कार्यालय |
| सुचक | : मा. बारसे प्रियांका प्रविण | अनुमोदक | : | मा. प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०५/०७/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

इ क्षेत्रिय कार्यालय भोसरी येथे विविध कामासाठी व अन्न पुरवठा कार्यालय, तसेच आधार कार्ड, पाणीपट्टी भरण्यासाठी अनेक नागरीक येतात. परंतु जवळपास ५०० ते १००० मी.अंतरापर्यंत कोणेतेही प्रकारचे उपहारगृह (कॅन्टीन) सोय नसल्याने येणारे नागरीक, अधिकारी, कर्मचारी, व नगरसदस्य तसेच वृध्द महिला पुरुषांची गैरसोय होत आहे. त्यासाठी इ क्षेत्रिय कार्यालयामध्ये उपहारगृहासाठी जागा उपलब्ध करून उपहारगृह चालू करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ०७ | विषय क्रमांक | : | ०४ |
| दिनांक | : ०५/०७/२०१९ | विभाग | : | स्थापत्य इ क्षेत्रिय कार्यालय, प्रा.शिक्षण मंडळ |
| सुचक | : मा. प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे | अनुमोदक | : | मा.भिमाबाई पोपट फुगे |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०५/०७/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र.३ च-होली येथील बुर्डेवस्ती येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळा क्र.२७ यास "श्री वाघजाई माता प्राथमिक शाळा" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ०८ | विषय क्रमांक | : | ०५ |
| दिनांक | : | ०५/०७/२०१९ | विभाग | : | स्थापत्य इ क्षेत्रिय कार्यालय |
| सुचक | : | मा. प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे | अनुमोदक | : | मा.गायकवाड निर्मला मनोज |

संदर्भ मा. घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन यांचे दिनांक ०५/०७/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र.४ मधील गणेशनगर येथील कॉलनी नं.८ येथील चौकास कॅप्टन सुदाम उत्तेकर यांचे व रामनगर येथील रस्त्यास कै.सुरेश दशरथ गायकवाड यांचे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ०९ | विषय क्रमांक | : | ०६ |
| दिनांक | : | ०५/०७/२०१९ | विभाग | : | स्थापत्य इ क्षेत्रिय कार्यालय |
| सुचक | : | मा.भिमाबाई पोपट फुगे | अनुमोदक | : | मा.सागर बाळासाहेब गवळी |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०५/०७/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र.३ च-होली येथील पठारेवस्ती येथील स.नं. ३०२, ३०३ भागास “श्री.नामदेव पठारे नगर” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(सुवर्णा बुर्डे)
अध्यक्षा, इ प्रभाग समिती

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/ १/कावि/२६३ /२०१९
दिनांक : २५ /०७/२०१९

प्रत-
सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.**

मा.सुवर्णा बुर्डे - आरोग्य विभागाने नवीन गाड्या उपलब्ध करून दिल्याबद्दल आरोग्य विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे इ प्रभाग समितीचे वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.
लाईट जाण्याबाबत चऱ्होली भागात नागरीकांच्या वारंवार आमचेकडे तक्रारी येत आसतात. लाईट नसल्याने पाणीपुरवठा काही भागात वेळेवर होत नाही. नळास पाणी आल्यावर विद्युत पुरवठा बंद होतो.
आनंदनगरी भागात लाईट पुरवठा बंद असल्यास पाणी येत नाही.
गंधर्व नगरी भागात अंडरग्राउंड केबल वर आलेले आहे. वर आलेल्या केबलला मुलगी चिटकणार होती, सुदैवाने वाचली. विद्युत तारांवर आलेल्या फांद्या तोडलेल्या नाहीत.

मा.प्रियांका बारसे - आरोग्य विभागाने कचरा उचलण्यासाठी गाड्या उपलब्ध करून दिलेल्या आहेत. याबद्दल आरोग्य विभागाचे अभिनंदन, गाड्यामध्ये जास्तीचा लोड टाकु नये, व्यवस्थित वापर करण्याबाबत गाडीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सूचना द्याव्यात. सभागृहात झालेली चर्चा नागरीकांमध्ये करू नये याबाबत सर्वांना सूचना द्याव्यात. अन्यथा सदरचा विषय मा.महासभेपुढे मांडला जाईल.
श्रमजिवी शाळे जवळील रस्त्याचे डांबरीकरणाचे काम बाकी आहे. तसेच ज्ञानसागर शाळेजवळ रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक बसविणे बाकी आहेत.
ममता स्विट जवळ पडलेला कचरा घेवून जाणे बाबत ४ दिवसापूर्वी फोन केलेला आहे परंतु अद्याप कचरा उचलण्यात आलेला नाही.
डीपी बॉक्स खराब झालेला आहे. त्याबाबत महावितरणाचे अभियंता यांचेशी संपर्क केल्यास ते फोन उचलत नाहीत. याबाबत १ वर्षापूर्वी पत्र दिलेले आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही.

मा.निर्मला गायकवाड - आरोग्य विभागाने ८ गाड्या उपलब्ध करून दिलेल्या आहेत. याबद्दल आरोग्य विभागाचे अभिनंदन. दिघी गावाची लोकसंख्या जास्त आहे, त्यामुळे तेथे आणखी ४ गाड्या तातडीने वाढवून देण्यात याव्यात. अंकुशराव लांडगे सभागृहातील बऱ्याचशा खूर्च्या मोळकळीस आलेल्या असून त्यांचे कूशन खराब झालेले आहेत, त्या बदलून टाकाव्यात. तसेच सभागृहात असलेले टॉयलेट खूपच घाण झालेले आहेत, ते स्वच्छ केले जात नाही. सदर सभागृहात कार्यक्रमास नामांकित व्यक्तीना बोलविण्यात येते त्यामुळे सदरचे वॉशरूमचे आधुनिक पध्दतीने नुतनीकरण करण्यात यावे.
पालखी वारीचे वेळी रस्त्यांचे कडेला असलेल्या झाडामध्ये पडलेला कचरा अद्याप उचलण्यात आलेला नाही.
गायकवाड नगर, एकता कॉलनी मध्ये कुत्र्यांची संख्या वाढलेली आहे. सकाळी मॉर्निंग वॉकचे वेळी मागे लागतात.
दिघी गावामध्ये लाईट जाण्याची समस्या वाढलेली आहे. मे महिन्यापासून ही समस्या असून त्यासाठी विद्युत महावितरण कंपनीने योग्य नियोजन करावे.
दिघीमधील पाण्याचे टाकीस नाव देणेबाबतचा ठराव प्रभाग समितीमध्ये दोन वर्षापूर्वी झालेला आहे परंतु अद्याप पर्यंत त्याबातची कार्यवाही करणेत आलेली नाही.
दोन पाण्याच्या टाक्या खराब झालेल्या आहेत त्यांना पेंटींग करून घ्यावी.

मा.लक्ष्मण उंडे - आरोग्य विभागाने नविन गाड्या उपलब्ध करून दिल्याबद्दल आरोग्य विभागाचे अभिनंदन. नवीन गाड्यांची क्षमता कमी असलेने जास्तीच्या गाड्या देण्यात याव्यात किंवा गाड्यांच्या फेरीमध्ये वाढ करण्यात यावी. गाडीवर काम करणारे कर्मचारी सायंकाळी ४ वाजलेनंतर कचरा उचलण्यास नकार देतात त्यांमुळे त्यांचे वेळेत आवश्यक बदल करण्यात यावा.

पिसाळलेल्या कुत्र्यांची संख्या वाढलेली आहे. या बाबत आवश्यक नियोजन करावे.

बिल्डरने लाईट बील भरले नाही म्हणून महावितरण विभागाने सोसायटीचे लाईट कट केले आहे.

मा.सागर गवळी - कचरा गाड्यांना रूट मॅप दिलेले नाहीत, त्यामुळे ते काही भागात जात नाहीत व काही भागात तीन ते चार गाड्या जमा होतात. त्यांना मॅप प्रमाणे रूट ठरवूण द्यावे. दिघी रोड इंद्रायणी सोसायटी मध्ये ८ दिवसापासून कचरा गाडी आलेली नाही. त्यांचेच बॅक साईडला दररोड गाडी येते.

रस्त्यावरील कचरा उचलण्यासाठी स्वतंत्र ट्रक किंवा गाड्यांचे नियोजन करावे. बीव्हीजीचे कर्मचारी रस्त्यावरील कचरा उचलण्यासाठी नागरीकांसोबत वाद करीत आहेत.

स्थापत्य विभागाने अमृत योजनेत कामे सूरू केलेली आहेत परंतु बाकी असलेली कामे पूर्ण करून घ्यावीत, कारण पाउस बंद झालेला आहे.

पाळीव मांजरांची संख्या वाढलेली आहे. ते घेवून जाणेबाबत नियोजन करावे.

रत्यावरील डीपीचे बरेच ठिकाणी दरवाजे तुटलेले आहेत, त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. फिडरची दूरूस्ती करून घ्यावी. दररोज ४ ते ५ तास लाईट जाते. त्याचा परिणाम पाणीपुरवठयावर होतो, त्यासाठी जनरेटर बसवून घ्यावे, लाईट गेल्यावर पंप बंद पडू नये याची दक्षता घ्यावी. पंपींग स्टेशनसाठी आवश्यक जनरेटरची व्यवस्था करून घ्यावी. पाणी वेळेवर न मिळाल्यास नागरीकांची कामे विस्कळीत होतात.

गवळी नगर व श्रीरामनगर येथे स्वतंत्र डीपी ची व्यवस्था करावी.

सर्व ठिकाणी स्ट्रीट लाईट बसवून घ्यावेत, सध्या काही ठिकाणी लाईट बंद असून काही ठिकाणीच्या तुटलेल्या आहेत.

मा.नितीन लांडगे - लांडेवाडी चौकात गायींची संख्या वाढलेली आहे. गायी नेहमी रस्त्यावरच असतात. गायींच्या शेणावरून बऱ्याच नागरीकांच्या मोटार सायकली स्लिप झालेल्या आहेत. गायींचे मालक कोण आहेत समजून येत नाही. त्यामुळे सदरच्या गायी घेवून गेल्यास त्यांचे मालक रस्त्यावर सोडणार नाहीत व त्यांची काळजी घेतील.

गायी, कुत्रे, मांजरे यांना नेण्यासाठी प्रभाग स्तरावर स्वतंत्र गाडी असणे आवश्यक आहे. याबाबत प्रभाग समितीमध्ये ठराव करण्यात यावा.

अनधिकृत विद्यूत वापर होत असलेने लोड येतो, याबाबत महावितरण कंपनीने पाहणी केली पाहिजे. संध्याकाळचे वेळी भोसरी मंडई जवळील भागात लोड वाढतो. इंडस्ट्रीयल वर्कशॉपमध्ये देखील अनधिकृत विज वापरली जाते.

मा.घुले नानी - बोपखेल भागामध्येही कुत्र्यांची संखा वाढलेली आहे, त्यांचा बंदोबस्त करणे खूप गरजेचे आहे व केलाच पाहिजे.

मा.सोनाली गव्हाणे - ज्या पंपींग स्टेशनसाठी जनरेटरची आवश्यकता आहे. त्याबाबत मागणी करून घ्यावी.

मा.भिमाबाई फुगे - भोसरी गावठाणातील डीपी १ वर्षापासून बदललेली नाही. त्यांची झाकणे बदललेली नाहीत. बरीचशी झाकणे तुटलेली आहेत.

मारूती मंदिराजवळ विद्युत खांबावर झाडाच्या फांद्या आलेल्या आहेत. सदर ठिकाणी एक वेळा स्फोट झालेला आहे. सदर झाडाच्या फाद्या छाटून घ्याव्यात.

पीएमटी चौकात मनपा शाळेत पाण्याच्या टाकीत पाणी चढत नाही. टाकीतील पहिले पाणी उपसा करून घ्यावे.

श्री.भरणे (महावितरण) - नवीन ट्रान्सफॉर्मर आलेले आहेत. ते बसविलेनंतर लोड शेडींगची समस्या दूर होईल.

श्री.घोडे - अंडर ग्राउंड केबलसाठी साहित्याची मागणी केलेली आहे.